।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University,Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(4 th Cycle)

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

जा.क्र. कबचौउमवि7-अ/2532/2026 दि.07/08/2026

प्रति,

1) मा.प्राचार्य/ संचालक.
कबचौउमविशी संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था

2) मा.संचालक/ विभाग प्रमुख,कबचौउमवि अंतर्गत सर्व शैक्षणिक प्रशाळा,/शैक्षणिक विभाग,

यांना ---

विषय :- अध्यादेश 174 नुसार श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नाव नोंदणी व परीक्षा अर्जांबाबत.

संदर्भ :- जा.क्र.कबचौउमवि7-अ/श्रेणी-गुणवत्ता सुधार सुधारीत नियमावली/3936/2026, दि.25/09/2023 अन्वये निर्गमीत केलेली सुधारीत नियमावली.

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिक्षेत्रात असलेली सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था / विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विद्यापीठ शैक्षणिक विभाग / विद्यापीठ उपकेंद्र यामध्ये शिकविल्या जाणाऱ्या सर्व पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी श्रेणी / गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत उपरोक्त संदर्भिय क्रमाकान्वये सुधारीत नियमावली लागू करण्यात आलेली असून सदर नियमावली विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर सुधारीत नियमावलीच्या अनुषंगाने ज्या विद्यार्थ्यांना अध्यादेश 174 नुसार /गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत नोंदणी करावयाची आहे, त्यांनी ज्या महाविद्यालये / परिसंस्था / शैक्षणिक प्रशाळा / शैक्षणिक विभाग /विद्यापीठ उपकेंद्र मधून पदवी / पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण केली आहे. त्या महाविद्यालय / परिसंस्थेच्या / शैक्षणिक प्रशाळेच्या / शैक्षणिक विभागाच्या / विद्यापीठ उपकेंद्राच्या मा.प्राचार्य / संचालक / विभाग प्रमुख यांच्या मार्फत श्रेणी / गुणवत्ता सुधार योजनेच्या सुधारीत नियमावली नुसार व वाढीव मुदतीसह आवश्यक ती सर्व दस्तऐवजे व शुल्कासह आपले प्रस्ताव खालील नमूद केलेल्या तक्त्यात दिलेल्या मुदतीत सादर करावेत. तसेच सदर नोंदणी प्रस्तावासोबत माहे मार्च /एप्रिल/ मे/ जून (उन्हाळी) मध्ये होणाऱ्या परीक्षेचा परीक्षा अर्ज श्रेणी / गुणवत्ता सुधार योजनेच्या नियमावलीत नमूद केलेल्या विविध शुल्कासह खालील मुदतीत विद्यापीठाकडे सादर करावेत.

| नाव नोंदणी व परीक्षा अर्ज सादर करणेसाठी मुदत | |
|---|---|
| विना विलंब शुल्क | विलंब शुल्कासह |
| 04/09/2026 ते 21/09/2026 | 22/09/2026 ते 06/10/2026 |

अपूर्ण दस्तऐवज किंवा अपूर्ण माहिती असलेला नाव नोंदणी अर्ज /परीक्षा अर्जावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही. तसेच सदर बाबत भरलेले शुल्क परत केले जाणार नाही.

..2

नाव नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे हिवाळी परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या परीक्षा वेळापत्रकात विविध वर्गांसाठी दिलेल्या मुदतीत नाव नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरुन विद्यापीठास सादर करावेत.

तरी उपरोक्त बाब सर्व संबंधितांना निदर्शनास आणून देवून नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करुन, विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(प्रा.योगेश एन.पाटील)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीसाठी :

1) मा.कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि,जळगाव 2) मा.प्र-कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि,जळगाव
3) मा.कुलसचिव कार्यालय,कबचौउमवि,जळगाव 4) मा.वित्त व लेखा अधिकारी,कबचौउमवि,जळगाव
5) प्र.पध्दती विश्लेषक,संगणक केंद्र,कबचौउमवि,जळगाव.
6) उपकुलसचिव,परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि,जळगाव
7) उपकुलसचिव,(अ.का) परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि,जळगाव
8) परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागातील सर्व नियंत्रक अधिकारी,कबचौउमवि,जळगाव
9) जनसंपर्क अधिकारी,कबचौउमवि,जळगाव.
10) समन्वयक, ई-सुविधा केंद्र,कबचौउमवि,जळगाव.